पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ३

**सभावृत्तांत**

दिनांक - **१६/१२/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१६/१२/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.आल्हाट मंदा उत्तम - सभापती**
२. मा.नंदा विकास ताकवणे
३. मा.आर.एस.कुमार
४. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील BSNL हद्दीमधून स्टॉर्म वॉटर लाईन टाकणेबाबत – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) प्रभाग क्र.६ मोशी गायकवाडवस्ती, नागेश्वरनगर, देहूफाटा लगतचे रस्ते, खिरीड वस्ती, बनकरवस्ती येथील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे कामातून धायरकरवाडी, इडूळगाव येथील मुख्य रस्ता डांबरीकरण करणेबाबत - मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.६ मोशी विनायकनगर, सावतामाळीनगर, से.नं.४,६,९,११ मध्ये विविध ठिकाणी रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे कामातून धायरकरवाडी, इडूळगाव येथील मुख्य रस्ता डांबरीकरण करणेबाबत - मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) चिखली मैलाशुध्दीकरण केंद्रातील जागेत उद्यान विकसित करणेबाबत – मा.आर.एस.कुमार, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील विकास आराखडयामधील सेक्टर २२ व सह्योगनगर ह्द्दीपासून ते तळवडे मुख्य रस्त्यास मिळणारा तसेच पुढे सेंट ऍन स्कुल पर्यंत जाणारा १२ मी. रस्ता विकासीत करणेबाबत - मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मधील चिखली तळवडे ते तळवडे मुख्य रस्ता १२ रस्ता विकसीत करणेबाबत – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मधील सोनिगरा हाईटस्  पासून जाणारा चिखली तळवडे ह्द्दा ते तळवडे मुख्य रस्ता ते रुपीनगर मुख्य रस्त्यास मिळणारा १२ मी. रस्ता विकसीत करणेबाबत - मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील मुख्य रस्ते विकसीत करुन चौक सुशोभिकरण करणे - मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील विकास आराखडयामधील तळवडे चिखली ह्द्द ते तळवडे मुख्य रस्त्यास मिळणारा २४ मी. रस्ता विकसीत करणेबाबत - मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **२१/१०/२०१६, ०४/११/२०१६, १८/११/२०१६ व ०२/१२/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०७ विषय क्रमांक – ०१

दिनांक – १६/१२/२०१६

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.नंदा ताकवणे

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.९ संभाजीनगर येथील BSNL ह्द्दीमधून स्ट्रॉम वॉटर लाईन टाकणेचे नियोजन आहे. BSNL ह्द्दीत नैसर्गीक नाल्यामध्ये आर.सी.सी.पाईपलाईन टाकणेस BSNL विभागामार्फत अद्याप परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे उपरोक्त कामाची सन २०१६-१७ ची अंदाजपत्रकीय तरतूद वाया जात आहे. तरी सदर कामामधून याच प्रभागात सुशोभिकरण कामाअंतर्गत स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०८ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १६/१२/२०१६

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.नंदा ताकवणे

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६ मोशी गायकवाडवस्ती, नागेश्वरनगर, देहूफाटा लगतचे रस्ते, खिरीड वस्ती, बनकरवस्ती येथील रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेचे काम मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांना दि.१०/१०/२०१६ रोजी देणेत आलेले आहे. तथापि धायरकरवाडी, इडूळगाव येथील मुख्य रस्ता खराब झालेला आहे. त्यामुळे तेथील स्थानिक नागरिकांस वाहतुकीस अडथळा होत आहे. त्यामुळे रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. त्यामुळे सदर रस्ता करणे आवश्यक आहे. उपरोक्त कामाऐवजी धायरकरवाडी, इडूळगाव येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०९ विषय क्रमांक – ०३

दिनांक – १६/१२/२०१६

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.नंदा ताकवणे

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६ मोशी विनायकनगर, सावतामाळीनगर, से.नं.४,६,९,११ मध्ये विविध ठिकाणी रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेचे काम मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन यांना दि.१०/१०/१६ रोजीचे आदेशान्वये देणेत आलेले आहे. तथापि धायरकरवाडी, इडूळगाव येथील मुख्य रस्ता पाण्याची लाईन टाकल्यामुळे व रस्त्याचा पृष्ठभाग देखील खराब झालेला आहे. त्यामुळे तेथील वाहतुकीस अडथळा होत आहे. त्यामुळे रस्त्याचे डांबरीकरण करणेची मागणी स्थानिक नागरिक यांनी केली आहे. त्यामुळे सदर रस्ता करणे आवश्यक आहे. उपरोक्त कामाऐवजी धायरकरवाडी, इडूळगाव येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १० विषय क्रमांक – ०४

दिनांक – १६/१२/२०१६

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.मंदा आल्हाट

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.४ येथे चिखली मैलाशुध्दीकरण केंद्रातील जागेत उद्यान विकसीत करण्याचे प्रस्तावित होते. परंतु चिखली मैलाशुध्दीकरण केंद्रामध्ये पर्यावरण विभागाने स्वतंत्र प्रकल्पाचे कामाची निविदा काढली असल्याने सदरचे काम तेथे करणे योग्य होणार नाही. त्यामुळे

मनपाचे इतर उद्यानामध्ये आवश्यकते प्रमाणे विविध स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ११ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १६/१२/२०१६

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.नंदा ताकवणे

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील विकास आराखडयामधील सेक्टर २२ व सहयोगनगर हद्यीपासून ते तळवडे मुख्य रस्त्यास मिळणारा तसेच पुढे सेंट ऍन स्कुल पर्यंत जाणारा १२ मी. रस्ता विकासीत करणेचे नियोजन आहे. प्रस्तावित १२ मी.रुंद रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात येण्यास लागणारा दिर्घ कालावधी तसेच सन्मा.नगरसदस्य व नागरिकांच्या मागणीनुसार व कामाच्या प्राध्यान्यतेनुसार उपरोक्त कामाच्या व्याप्तीमध्ये अंशत: बदल करणे आवश्यक वाटते. प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील विकास आराखडयामधील सेक्टर २२ व सहयोगनगर हद्यीपासून ते तळवडे मुख्य रस्त्यास मिळणारा तसेच पुढे सेंट ऍन स्कुल पर्यंत जाणारा १२ मी. रस्ता विकासीत करणे या कामांतर्गत होणा-या बचतीमधून प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील अन्य ठिकाणी रस्त्यांची व इतर आवश्यक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १२ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १६/१२/२०१६

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.नंदा ताकवणे

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मधील चिखली, तळवडे ते तळवडे मुख्य रस्ता १२ मी. रस्ता विकसीत करण्याचे नियोजन आहे. सदर प्रस्तावित १२ मी. रुंद रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात येण्यास लागणारा दिर्घ कालावधी तसेच सन्मा.नगरसदस्य व नागरिकांच्या मागणीनुसार व कामाच्या प्राधान्यतेनुसार उपरोक्त कामाच्या व्याप्तीमध्ये बदल करणे आवश्यक वाटते. तरी प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मधील चिखली, तळवडे ते तळवडे मुख्य रस्ता १२ रस्ता विकसीत करणे या कामांतर्गत प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील अन्य ठिकाणी रस्त्यांची आवश्यक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १३ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १६/१२/२०१६

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.नंदा ताकवणे

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मधील सोनिगरा हाईटस् पासून जाणारा चिखली तळवडे ह्या ते तळवडे मुख्य रस्ता ते रुपीनगर मुख्य रस्त्यास मिळणारा १२ मी. रस्ता विकसीत करणेचे नियोजन आहे. सदर प्रस्तावित १२ मी. रुंद रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात येण्यास लागणारा दिर्घ कालावधी तसेच सन्मा.नगरसदस्य व नागरिकांच्या मागणीनुसार व कामाच्या प्राधान्यतेनुसार उपरोक्त कामाच्या व्याप्तीमध्ये बदल करणे आवश्यक वाटते. तरी प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर मधील सोनिगरा हाईटस् पासून जाणारा चिखली तळवडे ह्या ते तळवडे मुख्य रस्ता ते रुपीनगर मुख्य रस्त्यास मिळणारा १२ मी. रस्ता विकसीत करणे या कामांतर्गत प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील अन्य ठिकाणी रस्त्यांची आवश्यक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक – ०८

दिनांक – १६/१२/२०१६

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.नंदा ताकवणे

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील मुख्य रस्ते विकसीत करुन चौक सुशोभिकरण करणेचे नियोजन आहे. प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील सुचविणेत आलेल्या विकास कामांमध्ये निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सन्मा.सदस्यांच्या व नागरिकांच्या मागणीनुसार तसेच निविदा कार्यवाहीच्या दिर्घ कालावधीमध्ये कामाच्या व्याप्तीमध्ये बदल करणेस भाग पडते त्यामुळे विषयांकित कामाचा प्राधान्यक्रम बदललेला असल्याने प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील मुख्य रस्ते विकसीत करुन चौक सुशोभिकरण करणे या कामांतर्गत होणा-या बचतीमधुन प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील अन्य ठिकाणी रस्त्यांची व इतर आवश्यक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक – ०९

दिनांक – १६/१२/२०१६

सुचक – मा.आर.एस.कुमार अनुमोदक – मा.नंदा ताकवणे

संदर्भ – मा.आर.एस.कुमार, मा.नंदा ताकवणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील विकास आराखडयामधील तळवडे चिखली हद्य ते तळवडे मुख्य रस्त्यास मिळणारा २४ मी. रस्ता विकसीत करणेचे नियोजन आहे. सदर प्रस्तावित २४ मी. रुंद रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात येण्यास लागणारा दिर्घ

कालावधी तसेच सन्मा.नगरसदस्य व नागरिकांच्या मागणीनुसार व कामाच्या प्राधान्यतेनुसार उपरोक्त कामाच्या व्याप्तीमध्ये अंशत: बदल करणे आवश्यक वाटते. तरी प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील विकास आराखडयामधील तळवडे चिखली हद्द ते तळवडे मुख्य रस्त्यास मिळणारा २४ मी. रस्ता विकसीत करणे या कामांतर्गत होणा-या बचतीमधून प्रभाग क्र.२ त्रिवेणीनगर येथील अन्य ठिकाणी रस्त्यांची व इतर आवश्यक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( आल्हाट मंदा उत्तम )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६८४/२०१६
दिनांक : १७/१२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2016 sub committee sabhapati.doc